# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### भूगोल विभाग

पुढारी | पुणे, शुक्रवार ७ सप्टेंबर २०१८



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, नानासाहेब टाकळकर.

## आदिवासी वारली पेंटिंग देशाचे कलावैभव : ॲड. बुट्टे पाटील

राजगुरुनगर : साधी सोपी आदिवासी वारली चित्रकला हे देशाचे कलावैभव असून महाराष्ट्राने जगाला दिलेली ही सुंदर कलात्मक देणगी आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे आयोजित वारली चित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी तारपा नृत्य, सण-उत्सव, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग, लग्न, बारसे, पूजाविधी आदी चित्रे रेखाटली. सर्व विद्यार्थी चित्रकारांना मुल्यांकन देऊन सन्मानित केले. आयोजन प्रा. डी. एम. मारकड, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. गणेश मोढवे यांनी केले.

सकाळ | शनिवार, ८ सप्टेंबर २०१८ | ४

## आदिवासी वारली चित्रकला भारताचे वैभव : बुट्टे

राजगुरुनगर, ता. ७ : "कलेमध्ये माणसाचे जीवन सुंदर व समृद्ध करण्याची क्षमता असून, आदिवासी वारली चित्रकला हे भारताचे कलावैभव आहे. महाराष्ट्राने जगाला दिलेली ही सुंदर कलात्मक देणगी आहे,'' असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने आयोजित वारली चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते. या प्रदर्शनात भूगोल विभागातील सुमारे ५८ विद्यार्थी सहभागी झाले. या वेळी बुट्टे पाटील म्हणाले, "प्राचीन काळापासून मानवाने विविध कलांची



राजगुरुनगर (ता. खेड): हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित वारली चित्र प्रदर्शन पाहताना मान्यवर.

परंपरा जपली आहे. वारली चित्रशैली हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. माणसाला अर्थपूर्ण जगण्यासाठी विविध कलांची आवश्यकता असून, त्यासाठी विद्यार्थ्यांनी छंद म्हणून एखादी कला आत्मसात करावी.'' भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक यांनी वारली चित्रकलेचा इतिहास सांगून या कलेची वैशिष्ट्ये, जीव्या सोमा मशे यांचे वारली चित्रकलेतील योगदान याबद्दल माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी वारली चित्रातील तारपा नृत्य, भातशेती, सण-उत्सव, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग, लग्न, बारसे, पूजाविधी आदी संदर्भातील चित्रे रेखाटली. या प्रदर्शनाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. गणेश मोढवे यांनी केले.

जनप्रवास
सोमवार, दि. १० सप्टेंबर २०१८

# आदिवासी वारली चित्रकला भारताचे कलावैभव : ॲड. बुट्टे पाटील



राजगुरुनगर | वार्ताहर

साधी सोपी आदिवासी वारली चित्रकला हे भारताचे कलावैभव असून महाराष्ट्राने जगाला दिलेली ही सुंदर कलात्मक देणगी आहे. कलेमध्ये माणसाचे जीवन सुंदर व समृध्द करण्याची क्षमता असून विद्यार्थ्यांनी वारली चित्रकला आत्मसात करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने आयोजित वारली चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते. या प्रदर्शनात भूगोल विभागातील सुमारे ५८ विद्यार्थी आपापल्या चित्रांसह सहभागी झाले होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, प्राचीन काळापासून मानवाने विविध कलांची परंपरा जपली आहे. वारली चित्रशैली हे त्याचे ठळक उदाहरण आहे. माणसाला अर्थपूर्ण जगण्यासाठी विविध कलांची आवश्यकता असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी छंद म्हणून एखादी कला आत्मसात करावी. भूगोल विभाग प्रमुख प्रा.दिलीप मुळूक यांनी वारली चित्रकलेचा इतिहास सांगून या कलेची वैशिष्टे, जीव्या सोमा माशे यांचे वारली चित्रकलेतील योगदान व या चित्रकलेच्या सद्यस्थितीबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वारली चित्रातील तारपा नृत्य, भात शेती, लग्न-उत्सव, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग, [illegible], [illegible], पूजाविधी आदि संदर्भातील चित्रे रेखाटली. वारली चित्र काढणाऱ्या सर्व विद्यार्थी चित्रकारांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रदर्शनाला विद्यार्थी - प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

केसरी पुणे, १० सप्टेंबर २०१८

# आदिवासी वारली चित्रकला भारताचे कलावैभव

राजगुरुनगर, (वार्ताहर) : साधी सोपी आदिवासी वारली चित्रकला हे भारताचे कलावैभव असून महाराष्ट्राने जगाला दिलेली ही सुंदर कलात्मक देणगी आहे. कलेमध्ये माणसाचे जीवन सुंदर व समृध्द करण्याची क्षमता असून विद्यार्थ्यांनी वारली चित्रकला आत्मसात करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने आयोजित वारली चित्रप्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते. या प्रदर्शनात भूगोल विभागातील सुमारे ५८ विद्यार्थी आपापल्या चित्रांसह सहभागी झाले होते.वारली चित्र काढणाऱ्या सर्व विद्यार्थी चित्रकारांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रदर्शनाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा.दिलीप मुळूक, प्रा.डी.एम.मारकड, प्रा.मच्छिंद्र मुळूक, यांनी केले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. १२ सप्टेंबर २०१८

# वारली चित्रकला भारताचे वैभव

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : साधी सोपी आदिवासी वारली चित्रकला हे भारताचे कलावैभव असून, महाराष्ट्राने जगाला दिलेली ही सुंदर कलात्मक देणगी आहे. कलेमध्ये माणसाचे जीवन सुंदर व समृद्ध करण्याची क्षमता असून, विद्यार्थ्यांनी वारली चित्रकला आत्मसात करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने आयोजित वारली चित्रप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

या प्रदर्शनात भूगोल विभागातील सुमारे ५८ विद्यार्थी आपापल्या चित्रांसह सहभागी झाले. या प्रदर्शनाचे आयोजन भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. मच्छींद्र मुळूक, प्रा. गणेश मोढवे यांनी केले.

ॲड. बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, प्राचीन काळापासून मानवाने विविध कलांची परंपरा जपली आहे. वारली चित्रशैली हे त्याचे ठळक उदाहरण आहे. माणसाला अर्थपूर्ण जगण्यासाठी विविध कलांची आवश्यकता असते. भूगोल विभागप्रमुख प्रा. मुळूक यांनी वारली चित्रकलेचा इतिहास सांगून या कलेची वैशिष्टे, जीव्या सोमा मशे यांचे वारली चित्रकलेतील योगदान व या चित्रकलेच्या सद्य:स्थितीबद्दल माहिती दिली.

◆ विद्यार्थ्यांनी वारली चित्रांतर्गत तारपा नृत्य, भात शेती, सण-उत्सव, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग, लग्न, बारसे, पूजाविधी आदी संदर्भातील चित्रे रेखाटली. वारली चित्र काढणाऱ्या सर्व विद्यार्थी चित्रकारांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रदर्शनाला विद्यार्थी-प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वारली चित्रप्रदर्शनाचे परीक्षण करताना संस्था पदाधिकारी

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख